मानवता समानता आध्यात्मिकता
# पुणे प्रार्थना समाज
४४१, बुधवार पेठ, पुणे ४११००२
स्थापना ४ डिसेंबर १८७० नोंदणी क्रमांक ई - ७८०(पुणे)

गेली १५० हून अधिक वर्षे पुणे प्रार्थना समाज ही संस्था “आत्मोन्नतीतून समाजोन्नती” या मार्गाने विविध उपक्रमांद्वारे अखिल समाजाशी जोडली गेली आहे. संस्थेच्या नावातच जो “समाज” शब्द आहे, त्याच्याशी हे सुसंगत आहे.

## संस्थेचे समाजाभिमुख उपक्रम

***स्त्री व बाल विषयक उपक्रम :

संस्थेमध्ये सुरुवातीच्या काही दशकांत स्त्री साक्षरता वर्ग तसेच स्त्रियांचे मेळे (साप्ताहिक) घेण्यात येत. त्यांतून स्त्रियांना व्यक्त व्हायला, लिखाण करायला प्रोत्साहन दिले जाई. यातूनच काशीबाई कानिटकर ह्या आद्य मराठी स्त्री-कादंबरीकार घडल्या. तसेच संस्थेमध्ये मुलांचे मेळे भरवले जात.

सुसंस्कार शिबिर: गेल्या २४ वर्षांच्या काळात (२००१ ते २०२४) संस्थेने ८ ते १२ वर्षे
व १३ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी १५ वेळा सुसंस्कार शिबिर हा १० ते १३ दिवसांचा उपक्रम उन्हाळ्याच्या सुट्टीत राबवला आहे. यात समाजाच्या सर्व थरांतील मुलांचा सहभाग होईल व त्यातून मुलांमध्ये एकजिनसी बंधुभाव जागृत होईल हे पाहिले आहे. समाजातील उच्चवर्गीय. उच्चमध्यमवर्गीय व मध्यमवर्गीय कुटुंबांतील मुलांबरोबरच कामगारांची आणि वंचित वर्गातील मुले सर्वजण एकत्रपणे शिबिराचा आनंद घेतात. या शिबिरांमध्ये मुलांवर सर्वव्यापी परमेश्वराची प्रार्थना, योगव्यायाम, प्रयोगातून विज्ञान व वैज्ञानिक दृष्टिकोन, भारतीय भाषांच्या ओळखीतून राष्ट्रीय एकात्मता, चित्रकला - हस्तकला - संगीत - नृत्य - नाट्य यांतून कलाप्रेम, कथाकथनातून बोध, डॉक्टरांबरोबरच्या गप्पांमधून आरोग्यविषयक जागरूकता, दैनंदिनी लेखनातून हस्तलेखन व पुनरावलोकन, एकत्र पौष्टिक प्रसादभोजनाच्या माध्यमातून अन्नदात्याविषयी कृतज्ञता व स्वावलंबन आणि वेळापत्रकानुसार अचूकपणे चालवल्या जाणाऱ्या प्रत्येक दिवशीच्या दिवसभराच्या उपक्रमांमधून शिस्तपालन असे सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास होईल असे सुसंस्कार मुलांवर केले जातात.

आंतरशालेय सामूहिक भजन गायन निरूपण स्पर्धा : आचरणात आणावयाचा शुद्ध धर्म विशद करणारे भजन निवडून त्याचा अर्थ समजावून सांगून सामूहिक गायन करणे असे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप असलेली “गाईन तुझे नाम” ही आंतरशालेय सामूहिक भजन गायन निरूपण स्पर्धा संस्थेने २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात ७ वर्षे घेतली.

***तरुणांसाठी / कामगारांसाठी उपक्रम :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस संस्थेतर्फे महाविद्यालयीन तरुणांसाठी उदार धर्मशिक्षण वर्ग, तसेच कामगारांसाठी रात्रशाळा चालविण्यात येत.

सन २००३ मध्ये युवक-मेळा आयोजित करण्यात आला होता त्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "मला दिसलेला परमेश्वर" ह्या विषयावर परिसंवाद समाविष्ट होता.

***शैक्षणिक कार्य :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस संस्थेतर्फे कामगारांच्या व दलितांच्या मुलांसाठी शाळा चालवली जात होती. सन १९५६ ते २००७ या कालावधीत संस्थेच्या जागेत मराठी माध्यमाची प्राथमिक शाळा चालवली जात होती. शाळेचे माजी विद्यार्थी अजूनही संस्थेच्या कार्यक्रमांत सहभागी होतात. सन २०१६ पासून संस्थेतर्फे पुण्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या निम्न स्तरातील हुशार विद्यार्थ्यांना तीन वर्षांसाठी शिष्यवृत्ती / पुस्तक अनुदान / शैक्षणिक अनुदान देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे.

***भांडारकर आश्रम निवास :

यंदा सन २०२४ मध्ये सुरू केलेला नवा उपक्रम म्हणजे उच्च शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आलेल्या होतकरू तरुणांना राहण्यासाठी संस्थेच्या आवारात "भांडारकर आश्रम निवास" ही वसतिगृह सुविधा निर्माण करण्यात आली आहे. या निवासी तरुणांचा व्यक्तिमत्व विकास एक जबाबदार भारतीय नागरिक म्हणून व्हावा या दृष्टीने त्यांच्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

***पीडितांना मदत :

कोवीड-१९ च्या काळात संस्थेतर्फे दोनदा शिधावाटप करण्यात आले: पुण्यात अडकलेल्या परराज्यातील कामगारांना (सन २०२० मध्ये) व गृहोद्योगावर विपरीत परिणाम झालेल्या व्यक्तींना (सन २०२१ मध्ये).

***आध्यात्मिक संगीत :

जातीधर्मभेदातीत असे आचरणात आणण्याचे अध्यात्म अर्थात शुद्ध धर्म विचार अखिल समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी शाळा, महाविद्यालये, गृहरचना संस्था, सार्वजनिक संस्था, सार्वजनिक उत्सव अशा विविध ठिकाणी जाऊन संतांच्या निवडक रचना व उपनिषदांमधील निवडक वचने यांवर आधारित संगीतमय निरूपण असे आध्यात्मिक संगीताचे १५० हून अधिक कार्यक्रम संस्थेने गेली ३५ वर्षे करून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. या कार्यक्रमांत कुमुदिनी काटदरे, हेमा गुर्जर, चंद्रकांत नाईक, धनश्री गणात्रा, वसंतराव घोरपडकर, मधुकर खाडिलकर, अंजली सिंगडे राव यांच्यासारख्या नामवंत संगीतज्ञांचा सहभाग अनेकदा होता.
याव्यतिरिक्त शास्त्रीय नृत्याच्या (कथक व भरतनाट्यम् ) माध्यमातून शुद्ध धर्मविचार मांडणारे "नृत्योपासना" कार्यक्रम संस्थेतर्फे विविध व्यासपीठांवर / रंगमंचांवर वेळोवेळी आयोजित करण्यात आले आहेत. अमला शेखर, अनुराधा शिंदे, नमिता मुजुमदार असे नामवंत नृत्यकलाकार यामध्ये सहभागी झाले.

***व्याख्याने :

विविध निमित्ताने जाणकार व विद्वान व्यक्तींची व्याख्याने संस्थेतर्फे आयोजित करण्यात येतात. गेल्या २५ वर्षांमध्ये संस्थेने निमंत्रित केलेले काही मान्यवर वक्ते असे: श्री. रवीशंकर बंदा(हैदराबाद), डॉ. जे. व्ही. नाईक(मुंबई), डॉ. गो. मा. पवार (सोलापूर), डॉ. वि. रा. करंदीकर, डॉ. सरोजा भाटे, डॉ. युवराज कदम, डॉ. वसुधा आपटे(मुंबई), डॉ. राजा दीक्षित, डॉ. सदानंद मोरे, डॉ. रणधीर शिंदे (कोल्हापूर).

***पुरस्कार वितरण :

संस्थेतर्फे सन २०१५ पासून वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक कार्य प्रदीर्घ काळ करणाऱ्या व्यक्ती/संस्थांना डॉ. रा. गो. भांडारकर पुरस्कार, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार, डेव्हीडा रॉबर्ट्स पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारांनी सन्मानित काही नावे अशी : डॉ. माधव गाडगीळ, श्री. संजय नहार, मानव्य संस्था, ज्योतिर्विद्या परिसंस्था, डॉ. मिलिंद भोई, मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, श्री. मारुती चितमपल्ली, अंधशाळा(पुणे), कामायनी संस्था.

***संस्कार विधी :

मानवी जीवनाशी संबंधित विविध प्रसंगांसाठी प्रार्थना समाजाने संस्कार विधी विकसित केले आहेत. त्यांपैकी विवाह विधी हा एक महत्त्वाचा संस्कार विधी आहे. आंतरजातीय विवाह, आंतरधर्मीय विवाह, विधवाविवाह ह्यांचा पुरस्कार धार्मिक/सामाजिक सुधारणा म्हणून प्रार्थना समाजाने स्थापनेपासूनच केलेला आहे. समाजातील जातीधर्मभेदाचे निर्मूलन करणे हे मोठे सामाजिक कार्य यातून साध्य झाले. अलिकडील काळात २०११ मध्ये पुणे प्रार्थना समाजाच्या हरिमंदिरात एक हिंदू - मुस्लिम विवाह प्रार्थना समाजाच्या पद्धतीने पार पडला.

*पुणे प्रार्थना समाजाच्या बहुआयामी समाजाभिमुख कार्याची दखल भारत सरकारच्या आयकर विभागाने घेतली आहे. पुणे प्रार्थना समाजाला प्राप्त देणग्या आयकर कलम ८०जी अन्वये करसवलतीस पात्र आहेत.

दि. १२-०७-२०२४. ~ डॉ. दिलीप जोग ~ डॉ. सुषमा जोग

विश्वस्त व सेक्रेटरी विश्वस्त व अध्यक्ष

(चलभाष क्र. 9422318488). (चलभाष क्र. ८८३०९५३५४३)